॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. १२ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रिय प्रशिक्षण व नियुक्ती कक्ष अंतर्गत दि. १२ जानेवारी, २०२६ रोजी सकाळी १० वाजता स्कूल ऑफ लाईफ सायन्सेस, स्कूल ऑफ केमिकल सायन्सेस, स्कूल ऑफ फिजिकल सायन्सेस, स्कूल ऑफ एन्व्हॉयमेन्टस अ‍ॅण्ड अर्थ सायन्सेस, व विद्यापीठ रासायनिक तंत्रज्ञान संस्था येथील विद्यार्थ्यांसाठी भाभा परमाणु अनुसंधान केंद्राची माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमाला केंद्रिय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक प्रा. उज्वल डी. पाटील, स्कूल ऑफ फिजीकल सायन्सेसचे संचालक प्रा. जयदिप साळी व डॉ. संजय घोष व इंटर्नशिप समन्वयक संदीपकुमार हे उपस्थित होते. भाभा परमाणु अनुसंधान केंद्राचे डॉ. अर्पण दास वैज्ञानिक अधिकारी व डॉ. बिस्वजित जाना वैज्ञानिक अधिकारी हे उपस्थित होते. डॉ. गौरी बिसेन घोष यांनी कार्यशाळेचे सुत्रसंचालन केले. कार्यशाळेसाठी २०८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. डॉ. अर्पण दास यांनी विद्यार्थ्यांना भारताच्या अणुऊर्जेची अफाट क्षमता आणि बीज निर्मिती आणि सहाय्यक क्षेत्रातील, इंधन सामग्रीचा विकास आणि भारताला भविष्यासाठी लागणारी ऊर्जा व याशिवाय बीएआरसी वर खर्च केलेल्या इंधनावर रासायनिक प्रक्रिया, आण्विक कचऱ्याची सुरक्षित विल्हेवाट तसे उद्योग, औषध आणि कृषी क्षेत्रात विकसित तंत्रज्ञान या सर्व क्षेत्रात बीएआरसीचे अमूल्य योगदाना संबंधीत माहिती दिली. डॉ. बिस्वजित जा यांनी बीएआरसीमध्ये विद्यार्थ्यांनी कसे करिअर करावे याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे व्यवस्थापन व प्रास्ताविक सोनाली दाया प्लेसमेंट ऑफिसर यांनी केले

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. १२ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळे अंतर्गत असलेले स्वामी विवेकानंद अध्ययन व संशोधन केंद्र, मेरा युवा भारत, जळगाव व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने १२ जानेवारी रोजी स्वामी विवेकानंद जयंती दिनानिमित्त विद्यापीठात स्वदेशी संकल्प दौड, पोस्टर स्पर्धा व परिसंवादाचे आयोजन सामाजिकशास्त्रे प्रशाळेचे सभागृह याठिकाणी करण्यात आल होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे उपस्थित होते. यावेळी मंचावर राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. राजेंद्र नन्नवरे आणि पत्रकार मनिष पत्रीकर तसेच अभिषेक चवरे, जिल्हा युवा अधिकारी, मेरा युवा भारत, जळगाव, डॉ. मनोज इंगोले हे उपस्थित होते.

याप्रसंगी मनिष पत्रीकर यांनी सांगितले की, तार्किक विचाराने आणि अनुभवांतून स्वामी विवेकानंदांनी धर्माकडे पाहिले. अध्यात्माचा उद्देश्य हा एकात्मता शोधणे हा असून यातून आंतरिक शक्ती ही वाढत असते. तर राजेंद्र नन्नवरे यांनी सांगितले की, धर्म आणि विज्ञानाच्या एकत्रीकरणातून समाजाची उन्नती होईल असे विवेकानंदांचे विचार होते. त्यामुळेच विवेकानंदांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव हा आईन्स्टाईन, जगदीशचंद्र बोस यांच्या सारख्या शास्त्रज्ञ यांच्यावर दिसून येतो. जमशेदजी टाटा व स्वामी विवेकानंद यांच्या भेटीतून निर्माण झालेले इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स हे अध्यात्म व विज्ञानाचे प्रारूप आहे असे त्यांनी सांगितले.

यावेळी अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. म. सु. पगारे यांनी सांगितले की, शिकागो येथील धर्म परिषदेत स्वामी विवेकानंदांनी त्याठिकाणी भारताची भूमिका मांडली होती. त्यामुळे स्वामी विवेकानंदांना एका विशिष्ट जातीच्या, धर्माच्या चौकटीत पाहणे हे सर्वस्वी अयोग्य ठरेल. वेदांतामध्ये त्यांनी कर्मकांडाला विरोध केलेला आहे. अध्यात्माच्या अनुषंगाने एकाग्र होण्यासाठी त्यांनी बुद्ध तत्वज्ञानातील ध्यानसाधनेचा अवलंब केला. बुद्धिवादाच्या, विवेकाच्या आणि विज्ञानाच्या मार्गाने स्वामी विवेकानंदांचे कार्य हे युवा पिढीला प्रेरक ठरणारे आहे असे प्रतिपादन त्यांनी केले.

समारोपावेळी पोस्टर स्पर्धेतील विजेत्यांना रोख बक्षिस व पारितोषिक देवून गौरव करण्यात आले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक विद्या सोनावणे, द्वितीय क्रमांक फरीदा तडवी तर तृतीय क्रमांक दामिनी पाटील या विद्यार्थिनीने पटकाविला. पोस्टर स्पर्धेच्या परिक्षकाचे काम डॉ. सागर चक्रनारायण व डॉ. सुदर्शन भवरे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. अभिषेक चवरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. दीपक खरात यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. मनोज इंगोले यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी प्रा. योगेश माळी, प्रा. कृष्णा संदानशिव, प्रा. कविता पाटील, चंद्रकांत वानखेडे, गौरव हरताळे, किरण पाटील, योगेश चौधरी, अनिल बिऱ्हाडे तसेच विद्यापीठातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १२ जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता